# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१३४१, २५६०१२०३
२५६०१२१८, २५६९६०६१
२५६९००६२, २५६९००६०
२५६९७२३२

*परीक्षा विभाग*
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in


परीक्षा-समन्वय/१४०५ दिनांक-: १०.१०.२००९

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये,
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

विषय-: सन २००९ च्या द्वितीयार्धात झालेल्या विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून काम केलेल्या व्यक्तिंची माहिती पाठविण्याबाबत-----

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंबंधी कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध परीक्षांसाठी अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी / मान्यताप्राप्त संस्थाच्या संचालकांनी करावयाची असून त्याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठास कळवावयाची आहे.

विद्यापीठाने बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती परीक्षा केंद्रावर येऊ न शकल्यास नजीकच्या अन्य संस्थेच्या महाविद्यालयाशी संपर्क साधून त्यांचे महाविद्यालयातील प्राध्यापकास बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून मा.प्राचार्य / मा.संचालक यांनी बोलावून घ्यावयाचे आहे. ज्या व्यक्तीने / प्राध्यापकाने अंतर्गत / बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून काम केले आहे अशा संबंधीतांची (कालावधी, परीक्षेचे नांव याबाबत) सविस्तर माहिती सन २००९ च्या द्वितीयार्धातील परीक्षा संपताच, विद्यापीठाकडे सोबतच्या प्रपत्रात त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

या संदर्भात पुढे असेही कळविण्यात येते की, **ज्या व्यक्तींची सन २००९ च्या द्वितीयार्धातील परीक्षेच्या कामासाठी आपल्या परीक्षा केंद्रावर बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, परंतु या ना त्या कारणाने त्या व्यक्तीने काम केले नाही व नाकारले अशा संबंधीत शिक्षकांची/ शिक्षकेतर सेवकांचीही तपशीलवार माहिती सोबतच्या प्रपत्रामध्ये पाठविण्यात यावी.**

मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये व मा.संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, त्यांनी विद्यापीठाच्या परीक्षांसाठी अंतर्गत /बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून वेळोवेळी काम केलेल्या प्राध्यापकांची सदर माहिती विद्यापीठास त्वरीत पाठवून नेहमीप्रमाणे सहकार्य करावे.

कळावे, धन्यवाद.

आपला विश्वासू,

(एस.एम.आहिरे)
प्रभारी परीक्षा नियंत्रक

सोबत-: वरीलप्रमाणे.

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Squad\Custodion.doc